महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/६/२०१०

<u>मा.स्थायी समिती सभा</u>
<u>सभा सुचना क्र.१३ दिनांक २४/६/२०१०</u>
<u>सभा क्रमांक १ दिनांक २९/६/२०१०</u>

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २९/६/२०१० रोजी सायं.४.००वाजता कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१३ दिनांक २४/६/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.मिलिंद माधव पाटणकर | सभापती |
| २. | श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३.. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ४. | श्रीमती सुरेखा सुरेश खातु | सदस्या |
| ५. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |
| ६. | श्रीमती स्मिता मधुकर देशमुख | सदस्या |
| ७. | श्रीमती कविता सुरेश पाटील | सदस्या |
| ८. | श्री.यासीन अयुब कुरेशी | सदस्य |
| ९. | श्री.गणेश यशवंत साळवी | सदस्य |
| १०. | श्री.राम पांडुरंग रेपाळे | सदस्य |
| ११. | श्री.संतोष वसंत वडवले | सदस्य |
| १२. | श्री.हरिष काशिनाथ वैती | सदस्य |

सदर सभेस गैरहजर असलेले सदस्य पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.नजीब सुलेमान मुल्ला | सदस्य |
| २. | श्री.भरत अभिमन्यु चव्हाण | सदस्य |
| ३. | श्री.शैलेश तुकाराम सावंत | सदस्य |

वंदे मातरम्‌ने सभेस सुरुवात करण्यात येते.
मा. सचिव सभेचा अजेंडा वाचुन दाखवितात.

श्री.नागसेन (भैय्यासाहेब) इंदिसे :-

मा.सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३६ चे विद्यमान नगरसेवक श्री.पद्यमाकर कांबळे यांचे काल अल्पशा आजाराने निधन झाले आहे. कांबळे यांना श्रध्दांजली अपर्ण करुन आजची स्थायी समिती सभा पुर्णवेळ तहकुब करण्यात यावी अशी मी सुचना करतो.

श्री.दिलीप बारटक्के :-

मा.सभापती महोदय, सन्मा.सदस्य श्री.इंदिसे यांनी जी सुचना मांडली आहे त्यास मी अनुमोदन देत आहे. पद्माकर कांबळे यांचे काल अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. ते आमच्या रायलादेवी प्रभाग समितीचे सदस्य होते. सतत तीन वेळा महापालिकेवर ते निवडून येत आहेत. त्यांचे काम, त्यांचा स्वभाव मिळुनमिसळून राहणारा असल्याने ते सर्व परिचीत होते. ते आपल्यातून निघुन गेले आहेत. त्ंयाचे मृतात्म्यास आज हया स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करुन आजची ही स्थायी समिती सभा पुर्णवेळ तहकुब करण्यात यावी.

मा.सभापती महोदय, आजची ही सभा श्रध्दांजली अर्पण करुन तहकुब होणार असली तरी आजच्या हया स्थायी समिती सभेस बरेच अधिकारी गैरहजर राहिले आहेत हे योग्य नाही असे खेदाने नमुद करावेसे वाटते. रायलादेवी प्रभाग समितीचीही आज सकाळी सभा झाली त्याही सभेस अधिकारी गैरहजर राहिले. अशा सभांना अधिकारी गैरहजर राहणे हे निषेधार्ह बाब आहे याची नोंद घ्यावी.

श्री.राम रेपाळे :-

मा.सभापती महोदय, आपल्या ठाणे महानगरपालिकेचे सन्मा.सदस्य श्री.पद्माकर कांबळे यांचे काल अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यामुळे त्यांचे कुटुंबियांवर फार मोठा आघात झाला आहे. पद्माकर कांबळे २००१ साली पोटनिवडणूकीत पहिल्यांदा निवडून आले आणि त्यानंतर सतत तीन वेळा ते महापालिकेवर निवडून आले. त्यांची काम करण्याची पध्दत अत्यंत चांगली होती. ते सर्वांमध्ये मिसळून राहत. प्रेमळ स्वभाव तसेच दुस-यासाठी मदत करण्याची प्रवृत्ती होती. अधिकारी वर्गावर त्यांची एक वेगळी छाप होती. प्रभागातील नागरिकांमध्येही त्ंयाचेबद्दल बराच जिव्हाळा होता. त्यांचे अंतयात्रेसाठी काल आम्ही उपस्थित होतो त्यावेळी प्रचंड जनसमुदाय अंतयात्रेमध्ये सामील झाला होता. एक चांगले नेतृत्व त्यांचे प्रभागतून हरपले आहे. कांबळे यांचे कुंटुंबियावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे पद्माकर कांबळे यांचे निधनाने त्यांचे कुटुंबामध्ये एक पोकळी निर्माण झाली आहे. सभागृहातील सर्व सदस्य व अधिकारी वर्ग यांचेवतीने मी परमेश्वरला पार्थना करतो की, पद्माकर कांबळे यांचे पवित्र आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो. तसेच हे दुःख सहन करण्याची ताकद परमेश्वर कांबळे कुटुंबियांना देवो. ओम शांती ओम शांती !

मा.सभापती :-

आपल्यातील एक नगरसेवक श्री.कांबळे यांचे कालच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. अतिशय  शांत स्वभावाचे परंतू सतत कामामध्ये मग्न असायचे. कामाशिवाय महापालिकेमध्ये इकडेतिकडे कांबळे दिसतात असे क्वचितच कुणीतरी बघितले असेल. कै.कांबळे यांचे आत्म्यास श्रध्दांजली वाहुन आजची ही सभा पुर्णवेळ तहकुब करण्यांत येत आहे.

( तद्‌नंतर सभागृहामध्ये दोन मिनिटे स्तब्धता पाळुन कै.कांबळे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)

**दुखवटा ठराव**

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८९६  दिनांक २९/६/२०१०**

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३६ मधील विद्यमान नगरसेवक पद्यमाकर संभाजी कांबळे यांचे काल २८/६/२०१० रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ४८ वर्षांचे होते.

पद्यमाकर कांबळे हे ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३६ मधून सन २००१ च्या पोटनिवडणूकीत प्रथम निवडून आले. तद्‌नंतर २००२ आणि २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीतही ते नगरसेवक म्हणुन निवडून आले होते. अत्यंत मनमिळावु व शांत स्वभाव असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांची काम करण्याची हातोटीही अतिशय चांगली तसेच शांत व गोड बोलणे असल्याने प्रभागातील नागरिक तसेच सर्वपक्षीय नगरसेवक व अधिकारी यांचेशी त्यांचे सलोख्यचे नाते निर्माण झाले होते.

पद्यमाकर कांबळे यांचे निधनाने त्यांचे कुटुंबियावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख कांबळे कुटुंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर देवो व कै.पद्यमाकर कांबळे यांचे आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन ही स्थायी समिती त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सही /- मिलिंद पाटणकर
सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

( तद्‌नंतर मा. सभापती सायं.४.१०वा.सभा तहकुब केल्याचे जाहीर करतात. )

सभापती,
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

( सौ. छाया मानकर )
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा तहकुब झाल्याची वेळ सायं.४.१० वा.
दिनांक २९/६/२०१०
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.